# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ९४-२२ दिनांक :- ३०/०३/२०२२

## राष्ट्रीय महामार्गावर रिक्षात प्रवासी म्हणुन बसुन रिक्षा चालकास चाकुचा धाक दाखवुन जबरी चोरी करणाऱ्या टोळीस अटक करुन २ गुन्हयाची उकल- वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

दिनांक - २२/०३/२०२२ रोजी रात्री ११:३० वा चे सुमारास फिर्यादी रिक्षा चालक हे मालाड येथे प्रवाशांची वाट पाहत असताना आरोपीत हे प्रवासी म्हणुन फिर्यादीचे रिक्षामध्ये बसले व चिंचोटी कामण येथे भाडे घेवुन जाण्यास सांगितले. फिर्यादीने रिक्षा चिंचोटी येथे आणली असता आरोपीच्या सांगणे प्रमाणे रिक्षा कामण रेल्वे स्टेशनकडे घेवुन जात असताना आरोपीत यांनी कामण जैन मंदीर जवळ रात्रीचे अंधाराचा फायदा घेवुन फिर्यादीस गाडी थांबविण्यास सांगुन तीन आरोपीतांनी फिर्यादीस ठोशाबुक्याने मारहाण करुन फिर्यादीच्या रिक्षा क्रमांक एम.एच ४७ ए.जे ४५३५ हिची पुढिल काच फोडुन फिर्यादीच्या शर्टचे खिशातील रोख रक्कम व पाकीट जबरीने काढुन घेवुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. सदर बाबत फिर्यादी यांनी वालीव पोलीस ठाणे येथे खबर दिल्याने ०३ अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा रजि.नं. ३३३/२०२२ भा.द.वि.स.क- ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयातील अनोळखी आरोपीत यांचा गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक माहीतीचे आधारे वालीव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने शोध घेऊन आरोपीत १) जुनैद अहमद इकलाख अहमद खान २) रिझवान नसीबअली शहा ३) नासीर हुसेन जाकीर हुसेन शेख तिन्ही रा. ठि. डोंगरीपाडा, नायगांव पुर्व यांना अटक करुन सदरचा गुन्हा उघडकीस करण्यात आला आहे.

अटक आरोपीत यांचेकडे अधिक चौकशी केली असता आरोपीत १) जुनैद अहमद इकलाख अहमद खान २) रिझवान नसीबअली शहा यांनी दिनांक – २३/०१/२०२२ रोजी पवई मुंबई येथुन प्रवासी रिक्षामध्ये बसुन राष्ट्रीय महामार्गावर सातीवली खिंडीत लघुशंकेचा बहाणा करुन रिक्षा चालकास मारहाण करुन त्याची रिक्षा, रोख रक्कम व मोबाईल जबरीने चोरी करुन पळुन गेले होते. सदर घटने बाबत वालीव पोलीस ठाणे गु.र.नं २११/२०२२ भा.द.वि.स.क- ३९२, ३४ नोंद असुन सदर गुन्हा आरोपीत यांनी केल्याचे कबुल केले असुन आरोपीत यांचेकडुन एक ॲटो रिक्षा व एक पॉकीट असा एकूण ५०,०००/- रुपये किंमतीचा माल हस्तगत केला आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, पोना.सचिन दोरकर, राजेंद्र फड, भालचंद्र बागुल, पो.अंम.गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.